प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

## निवडक




**कराड :** अभियांत्रीकी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांच्या हस्ते क्लब स्थापनेचे प्रमाणपत्र देण्यात आले.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'सायबर शक्ती' क्लबची स्थापना

**कराड, दि. १३ (प्रतिनिधी) -** येथील अभियांत्रिकी महाविद्यालय व क्विकहिल फाउंडेशन यांच्यात सायबर सुरक्षेसाठी नुकताच सामंजस्य करार झाला. या करारांतर्गत 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. करारानुसार महाविद्यालयात 'सायबर शक्ती' या क्लबची स्थापना करण्यात आली. सायबर सुरक्षेबाबत समाज व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे, हा या क्लबचा उद्देश आहे. उपक्रमाची सविस्तर माहिती क्लब समन्वयक प्राध्यापिका डॉ. प्रियांका शिंदे यांनी प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांना दिली. एमसीए विभागप्रमुख भागवत पाटील उपस्थित होते. उपक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विद्यार्थी प्रतीक गुंजाळकर, सचिव अनुराग वाझरकर, गतीविधी संचालक प्राजक्ता पवार आणि मीडिया संचालक वैष्णवी निकम यांची निवड करण्यात आली.